# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.

## मा.स्थायी समिती

### <u>कार्यपत्रिका क्रमांक - ११</u>

### (सभावृत्तांत)

दिनांक–३१/०५/२०१७ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा बुधवार,दिनांक ३१/०५/२०१७ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.सावळे सिमा रविंद्र - सभापती
२) मा.ठंडे लक्ष्मण धोंडू
३) मा.कुंदन अंबादास गायकवाड
४) मा.उत्तम प्रकाश केंदळे
५) मा.मुंढे उषा अंकुश
६) मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई
७) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे
८) मा.कुटे निर्मला संजय
९) मा.कोमल दिपक मेवानी
१०) मा.आशा धायगुडे-शेंडगे
११) मा.गोफणे अनुराधा देविदास
१२) मा.वैशाली जालिंदर काळभोर
१३) मा.मोरेश्वर महादू भोंडवे
१४) मा.अमित राजेंद्र गावडे
१५) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

याशिवाय मा.श्रावण हर्डीकर-आयुक्त, मा.तानाजी शिंदे-अति.आयुक्त, मा.उल्हास जगताप-नगरसचिव,मा.तळदेकर-मुख्यलेखापरिक्षक, मा.चव्हाण-प्र.शहर अभियंता, मा.डॉ.साळवे–वैद्यकीय संचालक,मा.ठाकूर-उपसंचालक नगररचना,मा.लांडे-मुख्यलेखापाल, मा.गावडे-सहआयुक्त, मा.पाटील, मा.तुपे,मा.पठाण–सहशहर अभियंता, मा.डोईफोडे, मा.खोसे, मा.दंडवते, मा.कडूसकर, मा.इंदलकर, मा.आष्टीकर, मा.लोणकर,मा.बोदडे,मा.खोत-सहाय्यक आयुक्त,मा.पवार-कायदा सल्लागार,मा.साळुंके-मुख्य उद्यान अधिक्षक, मा.पाटील-प्राचार्य,औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, मा.आवारी-प्रशा.अधिकारी (शिक्षण मंडळ), मा.पोमण-मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.निकम,मा.इंगळे,मा.तांबे,मा.चव्हाण, मा.थोरात,मा.कुलकर्णी,मा.खाबडे,मा.बरशेट्टी,मा.जुंधारे,मा.गलबले,मा.घोडे,मा.कांबळे,मा.ओंभासे,मा.गट्टूवार, मा.पुजारी,मा.गायकवाड,मा.भोसले, मा.मोरे, मा.पाटील, मा.घुबे, मा.रत्नपारखी-कार्यकारी अभियंता, मा.डॉ.गोरे-पशुवैद्यकीय अधिकारी,मा.गाडेकर-प्रशा.अधिकारी,मा.जरांडे-सुरक्षा अधिकारी, मा.कांबळे-मुख्यालय कक्षप्रमुख (पीएमपीएमएल) हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

------------

दिनांक १७/०५/२०१७ रोजी दु.२.०० वा. झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ९) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक – ४३६ विषय क्रमांक – १

दिनांक – ३१/०५/२०१७ विभाग – उद्यान

सूचक – मा.लक्ष्मण उंडे अनुमोदक – मा.कुंदन गायकवाड

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.उद्यान/६/कावि/४१९/२०१७ दि.६/५/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाचे उद्यान विभागाकडील निविदा नोटीस क्र.०३/२७/२०१६-१७ अन्वये ज्योतीबा उद्यान देखभाल संरक्षण करणेकामी मे.अजित स्वयं रोजगार सेवा सहकारी संस्था निविदा रक्कम रुपये ३३,९६,९६०/-(अक्षरी र.रू.तेहतीस लाख शहान्नव हजार नऊशे साठ फक्त) या ठेकेदाराची निविदा अंदाजपत्रकिय दरापेक्षा १७.०७ टक्के कमी दराने स्विकृत करून येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४३७ विषय क्रमांक – २

दिनांक – ३१/०५/२०१७ विभाग – लेखा

सूचक – मा.उत्तम कैंदळे अनुमोदक – मा.उषा मुंढे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा/३/कावि/२४२/२०१७ दि.१८/०५/२०१७

विषय - सन २०१५-१६ मधिल उर्वरित संचलनतूट रक्कम अदा करणेबाबत...

विषय क्रमांक २चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

**निर्णय**- पीएमपीएमएलचे अध्यक्ष मा.तुकाराम मुंढे यांना स्थायी समितीने पत्र दिले आहे. प्रशासनाकडूनही असे पत्र देण्यात यावे. पीएमपीएमएलचे अधिकारी श्री.गवळी व श्री.विलास मते यांना अध्यक्षांनी स्वतः फोन करुन सांगूनही ते बैठकीस उपस्थित नाहीत. पीएमपीएमएलचे अध्यक्ष मा.तुकाराम मुंढे महापालिकेत येत नाहीत, तोपर्यंत या विषयाला मान्यता देण्यात येणार नाही.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४३८ विषय क्रमांक – ३

दिनांक – ३१/०५/२०१७ विभाग – माध्यमिक शिक्षण

सूचक – मा.माधुरी कुलकर्णी अनुमोदक – मा.हर्षल ढोरे

संदर्भ:- मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.माध्य/शि/३/कावि/४८/१७ दि.१९/५/२०१७

विषय– सायन्स पार्क भेटीच्या देय बीलाबाबत तसेच पिंपरी चिंचवड विज्ञान केंद्रास भेटीकामी पुरविणेत आलेल्या प्रासंगिक करारावरील बिलाबाबत...

विषय क्रमांक ३चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –४३९ विषय क्रमांक – ४

दिनांक – ३१/०५/२०१७ विभाग – क्रीडा

सूचक – मा.निर्मला कुटे अनुमोदक – मा.कोमल मेवानी

संदर्भ:- मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.क्रीडा/७अ/कावि/२५५/२०१७ दि.२०/०४/२०१७

विषय – कासारवाडी जलतरण तलाव पाणी शुध्दीकरण, परिसर स्वच्छता, साफसफाई देखभाल व यांत्रिक देखभाल दुरूस्ती कामकाजाबाबत...

विषय क्रमांक ४चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

**निर्णय-** करारनाम्याची मुदत चौथ्या महिन्यात संपत असेलतर तीन महिन्यांपूर्वीच निविदेची प्रक्रिया सुरु झाली पाहिजे. विभागांतर्गत फाईल फिरताना वेळेचा अपव्यय न होता नागरीकांच्या फाईलींवर लवकरात लवकर कार्यवाही होणेबाबत प्रशासनाने परिपत्रक प्रसिद्ध करावे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –४४० विषय क्रमांक – ५

दिनांक – ३१/०५/२०१७

सूचक – मा.अनुराधा गोफणे अनुमोदक – मा.मोरेश्वर भोंडवे

संदर्भ:- मा.अंबरनाथ कांबळे, मा.सचिन भोसले यांचा प्रस्ताव...

मा.क्रिडा, कला साहित्य व सांस्कृतिक समिती ठराव क्रमांक ०८ दिनांक १२/०५/२०१७ नुसार, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे विद्यानगर रामनगर, व्यायामशाळा प्रभाग क्र.१० ही व्यायामशाळा शिवसमर्थ मित्र मंडळ, विद्यानगर रामनगर येथील मंडळाला ११ महिने कराराने दरमहा सेवाशुल्क र.रू.२,०००/-(अक्षरी र.रू.दोन हजार फक्त) मनपा कडून घेऊन सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –४४१ विषय क्रमांक – ६

दिनांक – ३१/०५/२०१७

सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.वैशाली काळभोर

संदर्भ:- मा.राजेंद्र गावडे, मा.बाळासाहेब ओव्हाळ यांचा प्रस्ताव-

मा.क्रिडा, कला साहित्य व सांस्कृतिक समिती ठराव क्रमांक ०९ दिनांक १२/०५/२०१७ नुसार शिवशक्ती महिला बचतगट २००६ पासून पिंपरी चिंचवड मध्ये कार्यरत असून त्यांचे कार्य समाधानकारक आहे.तरी प्रभाग क्र.१७ मधील गुरूवर्य दादोजी कोंडदेव व्यायामशाळा शिवशक्ती महिला बचतगटास ११ महिने कराराने दरमहा सेवाशुल्क र.रू.२,०००/- (अक्षरी र.रू.दोन हजार फक्त) मनपा कडून घेऊन सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –४४२ विषय क्रमांक – ७
दिनांक – ३१/०५/२०१७ विभाग – स्थापत्य
सूचक – मा.अमित गावडे अनुमोदक – मा.माधुरी कुलकर्णी
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/लेखा/१/कावि/१४६९/२०१७ दि. २०/५/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.७९/२०१६-१७ मधील काम क्र.१ अन्वये नाशिक फाटा ते वाकड बीआरटीएस रस्त्यावर साई चौक (जगताप डेअरी) रहाटणी येथे दोन समांतर विलगक (ग्रेड सेपरेटर) बांधणेकामी मे.व्ही.एम.मातेरे इन्फ्रा.(इं) प्रा.लि. नि.र.रु.२१,४७,८७,८७८/- Lumpsum व र.रू.६,८८,९१,०१७/- Utility/Royalty एकूण र.रू.२८,३६,७८,८९५/- या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने Lumpsum र.रू.२१,२६,३९,०००/- + Utility/ Royalty ६८८९१०१७/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –४४३ विषय क्रमांक – ८
दिनांक – ३१/०५/२०१७ विभाग – मध्यवर्ती भांडार
सूचक – मा.माधुरी कुलकर्णी अनुमोदक – मा.हर्षल ढोरे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मभां/७/कावि/३४७/२०१७ दि.१९/५/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाचे आरोग्य विभागास ४.५ घनमिटर क्षमतेचे बीन्स कंटेनर खरेदीकामी ई-नि.क्र.५८/२०१६-१७ अन्वये ऑनलाईन निविदा दर मागविणेत आलेले होते. त्यामध्ये प्राप्त निविदाकारापैकी मे.निर्मीती इंजि.कॉर्पो. व मे.रेखा इंजि.वर्क्स यांचे ४.५ घनमिटर क्षमतेचे बीन्स कंटेनर समान लघुत्तम दर र.रू.७४,६७७/- प्र.नग प्राप्त झालेले आहेत. प्राप्त लघुत्तम दराने आरोग्य विभागास एकूण २३० नग ४.५ घनमिटर क्षमतेचे बीन्स कंटेनर खरेदी कामी एकूण र.रू १,७१,७५,७१०/- इतका खर्च येणार आहे. प्राप्त लघुत्तम दर हे मनपा अंदाजपत्रकीय दर एकूण र.रू.१,७५,९५,०००/- पेक्षा २.३८% ने कमी आहेत. सदर दर स्विकृत करणेस व प्राप्त समान लघुत्तम निविदाकार यांना सदरचे काम विभागून देणेस मान्यता दिलेली असून त्यांचेबरोबर करारनामा करून पुरवठा आदेश निर्गत करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –४४४ विषय क्रमांक – ९
दिनांक – ३१/०५/२०१७ विभाग – मध्यवर्ती भांडार
सूचक – मा.लक्ष्मण उंडे अनुमोदक – मा.कुंदन गायकवाड
संदर्भः- मा.सहा.आयुक्त यांचे जावक क्र.मभां/५/कावि/६५०/२०१७ दि.१६/५/२०१७

मा.सहा.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाचे मा.पदाधिकारी व मा.अधिकारी यांचे कार्यालयीन कामकाजासाठी उत्पादीत कंपनीचे मोबाईल संच साहित्य पुरवठा करणेकामी ई.नि.सुचना क्र.८३/२०१६-१७ अन्वये मे.इंदु इन्फोटेक सोल्युशन, भोसरी, पुणे-३९ यांना आवश्यक मोबाईल संच खरेदी कामी एकूण र.रु.५,९९,७००/- (अक्षरी र.रू.पाच लाख नव्यान्नव हजार सातशे फक्त) दर स्विकृत करून करारनामा करून पुरवठा आदेश निर्गत केला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४४५ विषय क्रमांक – १०
दिनांक – ३१/०५/२०१७ विभाग – औ.प्र.संस्था (मुलींची) कासारवाडी
सूचक – मा.उत्तम केंदळे अनुमोदक – मा.उषा मुंढे
संदर्भः- मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.औप्रसंमु/१/कावि/१८८/२०१७ दि.१९/५/२०१७

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

प्रस्तावात नमूद प्रमाणे औद्योगिक प्रशिक्षण संस्था (मुलींची) कासारवाडी मानधन निदेशकांना मे.उच्च न्यायालय येथे म.न.पा. विरूध्द दाखल दावा क्र.११६५१/२०१६ नुसार मे.उच्च न्यायालय यांचे अंतरीम आदेशास अधीन राहून व मा.कायदा सल्लागार यांच्या अभिप्रायानुसार दि.१९/०४/२०१७ रोजी एक दिवस सेवाखंड देवून दिनांक २०/०४/२०१७ ते १९/१०/२०१७ पर्यंत सहा महिने कालावधीकरीता दरमहा र.रू.२०,०००/- मानधनावर हंगामी तात्पुरत्या स्वरूपाची नेमणूक देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –४४६ विषय क्रमांक – ११
दिनांक – ३१/०५/२०१७ विभाग – स्थापत्य अ मुख्यालय
सूचक – मा.माधुरी कुलकर्णी अनुमोदक – मा.हर्षल ढोरे
संदर्भः- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/अ-मुख्य/४९०/१७ दि.२२/५/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.६७/०४/२०१६-१७ प्रभाग क्र.१६ नाला ट्रेनिंगची कामे करणे (नाल्याच्या भिंतीची उंची वाढवणे जाळ्या बसविणेकामी) **M/s. SHRIKRUPA ENTERPRISES** नि.र.रु.३६,७८,५५३/-(अक्षरी छत्तिस लाख अठ्याहत्तर हजार पाचशे त्रेपन्न फक्त) पेक्षा २२.२०% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.३०,०५,०१०/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये

झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४४७ विषय क्रमांक – १२

दिनांक – ३१/०५/२०१७ विभाग – वैद्यकीय मुख्य कार्यालय

सूचक – मा.निर्मला कुटे अनुमोदक – मा.कोमल मेवानी

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वैद्य/१/कावि/७५१/२०१७ दि.२०/५/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

दि.१७/०६/२०१७ व १८/०६/२०१७ रोजी जगदगुरू संत तुकाराम महाराज यांची पालखी मनपा कार्यक्षेत्रामधील आकुर्डी येथे मुक्कामी असते. सदर वेळी वारक-यांना मनपाचे रुग्णालयामार्फत मोफत वैद्यकीय सेवा व उपचार देण्यात येतात. पालखी सोहळ्यामध्ये सहभागी होणा-या वारक-यांना सालाबादप्रमाणे वैद्यकीय सुविधा मोफत देणे आवश्यक असलेने एक तातडीची व विशेष बाब म्हणुन वारक-यांना मोफत वैद्यकिय सुविधा देणेस मान्यता मिळणे आवश्यक असल्याने मनपाचे सर्व दवाखाने व रुग्णालयांमार्फत वारक-यांना मोफत वैद्यकीय सेवा-सुविधा देणेस मान्यता देणेत येत आहे.

**निर्णय** – बाथरुमच्या सोयीसाठी मेणकापडाचे कंपार्टमेंट तयार करुन घ्यावेत.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४४८ विषय क्रमांक – १३

दिनांक – ३१/०५/२०१७ विभाग – दक्षता व नियंत्रण कक्ष

सूचक – मा.अनुराधा गोफणे अनुमोदक – मा.मोरेश्वर भोंडवे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.दवनि/कावि/२/८३/२०१७ दि.२२/०५/२०१७

विषय – पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सांगवी स्मशानभूमीत पर्यावरणपूरक गॅस शवदाहिनी बसविणेच्या कामाचा आर्थिक व तांत्रिक सल्ला अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे यांचेकडून घेणेबाबत...

विषय क्रमांक १३चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

**निर्णय-** सर्वप्रथम जी वर्कऑर्डर दिली होती, ती थांबवावी. पर्यावरणपूरक गॅस शववाहिनी संदर्भातील जो चौकशी अहवाल आला आहे, त्याच्यावर प्रशासनाकडून काय कारवाई केली हे सभागृहापुढे मांडावे. तोपर्यंत हा विषय तहकूब करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४४९ विषय क्रमांक – १४
दिनांक – ३१/०५/२०१७ विभाग – स्थापत्य
सूचक – मा.आशा धायगुडे-शेंडगे अनुमोदक – मा.वैशाली काळभोर
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/उद्यान/कावि/१८/२०१७ दि.२३/५/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य उद्यान विभागाकडील नि.नो.क्र.३४/०७/२०१६-१७ मधील काम क्र.४ अन्वये, प्रभाग क्र.४० खराळवाडी येथील आ.क्र.१०२ व १०३ येथे उद्यान विकसित करणेकामी मे.एच.सी.कटारिया निवीदा र.रु.१,८६,७४,०१३/-(अक्षरी र.रू.एक कोटी,शहयाऐंशी लाख,चौ-याहत्तर हजार,तेरा फक्त) पेक्षा ७.७०% कमी या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रू.१,८०,९७,९२०/- पर्यत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४५० विषय क्रमांक – १५
दिनांक – ३१/०५/२०१७ विभाग – इ क्षेत्रीय कार्यालय
सूचक – मा.अमित गावडे अनुमोदक – मा.आशा धायगुडे-शेंडगे
संदर्भ:- मा.क्षेत्रिय अधिकारी यांचे जावक क्र.इक्षेका/आर/कावि/२३२/२०१७ दि.२३/०५/२०१७

मा.क्षेत्रिय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या इ क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील प्रभाग क्र.२९, ३२, ३३, ३४, ३५ व ३६ मधील नाले साफसफाई करुन गाळाची वाहतूक करणे या कामाची नि.नो.क्र.१/२०१७-२०१८ अन्वये निविदा र.रु.१५,०५,१५२/-वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द करुन दर मागविण्यात आले आहेत. सदर निविदेचे पाकीट क्र.२ हे दि.१३/५/२०१७ रोजी उघडण्यात आली आहे. सदर निविदेच्या अनुषंगाने मे.राजलक्ष्मी स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था यांनी अंदाजपत्रकीय र.रु.१५,०५,१५२/- पेक्षा ३२.०७% कमीने म्हणजेच र.रु.१०,२२,४५०/- इतक्या रकमेची होत असल्याने सदरचे दर स्विकृत करणेत आले असून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेऊन कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४५१ विषय क्रमांक – १६
दिनांक – ३१/०५/२०१७ विभाग – इ क्षेत्रीय कार्यालय आरोग्य
सूचक – मा.कैलास बारणे अनुमोदक – मा.लक्ष्मण उंडे
संदर्भ:- मा.क्षेत्रिय अधिकारी यांचे जावक क्र.इक्षेका/आर/कावि/२३५/२०१७ दि.२३/०५/२०१७

मा.क्षेत्रिय अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ क्षेत्रिय कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील प्रभाग क्र.६,२९, ३०,३२,३३,३४,३५ व ३६ मधील स्ट्रॉमवॉटर चेंबर्ससाफ सफाई करणे या कामाची

नि.नो.क्र.२/२०१७-१८ अन्वये निविदा र.रु.६,३९,६३०/- वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द करुन दर मागविण्यात आले आहेत. सदरची निविदा दि.०५/०५/२०१७ रोजी उघडण्यात आली आहे. सदर निविदाचे अनुषंगाने मे. राजलक्ष्मी स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था यांनी अंदाजपत्रकीय र.रु.६,३९,६३०/- पेक्षा ३७.६७% कमीने म्हणजेच र.रु.३,९८,६८१/- इतक्या रकमेची होत असल्याने सदरचे दर स्विकृत करून सदर संस्थेबरोबर करारनामा करुन कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४५२ विषय क्रमांक – १७
दिनांक – ३१/०५/२०१७ विभाग – माहिती व जनसंपर्क
सूचक – मा.लक्ष्मण उंडे अनुमोदक – मा.कुंदन गायकवाड
संदर्भ:- मा.सहा.आयुक्त यांचे जावक क्र.माजसं/३/कावि/३१६/२०१७ दि.२२/०५/२०१७

मा.सहा.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

महानगरपालिकेच्या विविध विभागांकडील मागणी नुसार उदा.मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार अनाधिकृत बांधकामावर कारवाई करणे, विविध विषय समित्या सभापती निवडणुक व नेमणूक, विविध महोत्सव, मान्यवर व्यक्तींचा सत्कार, समारंभ, इ. ची व्हिडीओ शुटींग करुन घेणेसाठी कोटेशन नोटीस क्र.१/२ २०१४-२०१५ प्रसिद्ध करणेत आली होती. त्यानुसार मे.दर्शन डिजिटल व्हिडीओग्राफी यांना कामाचा आदेश क्र. माजसं/५/कावि/१५८/२०१५ दि. १०/०४/२०१५ देणेत आलेला होता. मा. स्थायी समितीने ठराव क्र.१६६४५ दि.०५/०७/२०१६ अन्वये मे.दर्शन डिजिटल व्हिडीओग्राफी यांना सन २०१६-२०१७ करिता मुदतवाढ देऊन कामकाज करण्यास व येणा-या खर्चास मान्यता दिलेली होती. सध्या निविदा प्रक्रिया चालू आहे.मे. दर्शन डिजिटल व्हिडीओग्राफी यांनी पुर्वीच्या दराने कामकाज करणेस संमती दर्शविली असल्याने माहे एप्रिल २०१७ ते माहे जुलै २०१७ पर्यंत सदर कामास मुदतवाढ देणेस व येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४५३ विषय क्रमांक – १८
दिनांक – ३१/०५/२०१७ विभाग – स्थापत्य अ मुख्यालय
सूचक – मा.उत्तम केंदळे अनुमोदक – मा.उषा मुंढे
संदर्भ:- मा.शहर अभियंता यांचे जावक क्र.स्था/नि/अ-मुख्य/४९१/१७ दि.२४/५/२०१७

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.६७/०३/२०१६-१७ प्रभाग क्र.८ मध्ये स्वच्छतागृहाची दुरुस्ती करणेकामी M/s.PADMINI CONSTRUCTION नि.र.रु.८,४०,३३६/- (अक्षरी आठ लाख चाळीस हजार तीनशे छत्तीस फक्त) पेक्षा २०.९९% कमी या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.६,९७,१४७/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे

बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४५४ विषय क्रमांक – १९

दिनांक – ३१/०५/२०१७ विभाग – पशुवैद्यकीय

सूचक – मा.माधुरी कुलकर्णी अनुमोदक – मा.हर्षल ढोरे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पवै/१/कावि/८१/२०१७ दि.१५/५/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

महानगरपालिकेच्या निसर्गकवी बहिणाबाई चौधरी प्राणिसंग्रहालयाचे ठिकाणी यापुर्वी नेमणूक केलेल्या सर्पमित्रांपैकी समाधानकारक काम करणा-या प्रस्तावात नमूद ४ सर्पमित्रांना प्राणिसंग्रहालयातील ऍनिमल किपर पदाची नेमणूक होईपर्यंत अथवा ६ महीने कालावधीकरिता जो कालावधी कमी असेल त्या कालावधीकरिता यापुर्वीच्या नेमणूकीच्या अटी व शर्तींवर मुदतवाढ देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४५५ विषय क्रमांक – २०

दिनांक – ३१/०५/२०१७ विभाग – पशुवैद्यकिय

सूचक – मा.कैलास बारणे अनुमोदक – मा.लक्ष्मण उंडे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पवै/१/कावि/८२/२०१७ दि.१५/५/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका निसर्ग कवी बहीणाबाई चौधरी प्राणी संग्रहालयाचे ठिकाणी ऍनिमल किपर हे पद पुर्णवेळ नियुक्त असणे आवश्यक असलेचे C.Z.A. यांचे स्पष्ट निर्देश प्राप्त झाले आहेत. C.Z.A. यांचे दिनांक २०/०६/२०१६ रोजीचा ई-मेल मध्ये प्राणीसंग्रहालयाचे नुतनीकरण प्राप्त होणेकामी काही आक्षेपांची पुर्तता तसेच अनुपालन करणे आवश्यक असलेचे नमुद केले आहे. या आक्षेपांची पुर्तता केलेनंतर प्राणी संग्रहालयास C.Z.A. यांची सन२०१८ पर्यंत मान्यता प्राप्त होणार आहे. प्राणी संग्रहालयाचा लुठेवणे/ चालविणे या करीता C.Z.A. यांची मान्यता घेणे बंधनकारक आहे. प्रस्तावात नमुद पदांचा महापालिकेमार्फत शासनाकडे पाठविणेत आलेल्या आकृतीबंधामध्ये समावेश करणेत आलेला आहे. तथापि आकृतीबंधास मान्यता मिळेपर्यंत उपरोक्त पदे मानधन तत्वावर नियुक्त करणेकामी विभागाव्दारे प्रस्तावित करणेत येत आहे. या पदासाठी मा. कामगार कल्याण अधिकारी यांचेकडील प्रचलित किमान वेतन दर नियमानुसार अदायगी करणेत येईल. वरील पदे मानधन तत्वावर नियुक्त करणेकामी खालीलप्रमाणे निकष ठरविणेत येत आहेत.

**१. ऍनिमल किपर:- पदसंख्या - ६**

शैक्षणिक अर्हता-(१) किमान १०वी पास तथापि १२ पास उमेदवारांना प्राधान्य.

(२) वन्यजीव क्षेत्राची आवड तथा याविषयीचे सामान्य ज्ञान तथा कौशल्य

(३) प्राणीसंग्रहालयातील कामकाजाचा अनुभव असलेस प्राधान्य.

उपरोक्त नमुद ॲनिमल किपर पदी (पद संख्या ०६) - एकत्रित मानधन तत्वावर नियुक्तीची कार्यवाही करणेबाबत ७ दिवस कालावधीकरिता जाहीरात प्रसिध्द होऊन थेट मुलाखत पध्दतीने (WALK IN INTERVIEW) ने एकत्रित मानधनावर घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४५६ विषय क्रमांक – २१

दिनांक – ३१/०५/२०१७ विभाग – पशुवैद्यकिय

सूचक – मा.लक्ष्मण उंडे अनुमोदक – मा.कुंदन गायकवाड

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पवै/१/कावि/८३/२०१७ दि.१५/५/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका निसर्ग कवी बहीणाबाई चौधरी प्राणी संग्रहालया चे ठिकाणी पशुवैदयक आणि प्राणिशास्त्रज्ञ तथा शैक्षणिक अधिकारी (बायोलॉजिस्ट) ही पदे पुर्ण वेळ नियुक्त असणे आवश्यक असलेचे C.Z.A. यांचे स्पष्ट निर्देश प्राप्त झाले आहेत. C.Z.A.यांचे दिनांक २०/०६/२०१६ रोजीचा ई-मेल मध्ये प्राणी संग्रहालयाचे नुतनीकरण प्राप्त होणेकामी काही आक्षेपांची पुर्तता तसेच अनुपालन करणे आवश्यक असलेचे नमुद केले आहे. या आक्षेपांची पुर्तता केलेनंतर प्राणी संग्रहालयास C.Z.A. यांची सन २०१८ पर्यंत मान्यता प्राप्त होणार आहे. प्राणी संग्रहालय चालु ठेवणे/चालविणे याकरीता C.Z.A. यांची मान्यता घेणे बंधनकारक आहे. प्रस्तावात नमुद पदांचा महापालिकेमार्फत शासनाकडे पाठविणेत आलेल्या आकृतीबंधा मध्ये समावेश करणेत आलेला आहे. तथापि आकृतीबंधास मान्यता मिळेपर्यंत उपरोक्त पदे मानधन तत्वावर नियुक्त करणेकामी विभागाव्दारे प्रस्तावित करणेत येत आहे. वरील पदे मानधन तत्वावर नियुक्त करणेकामी निकष खालील प्रमाणे-

**१) पशुवैदयक :- पदसंख्या - १**

१) किमान शैक्षणीक अर्हता– B.V.Sc.& A.H. पदवी.

२) वन्यजीव शास्त्रातील पदव्यूत्तर पदवी अथवा वन्यजीव विषया सह M.V.Sc पदवी

३) प्राणी संग्रहालयातील कामकाजाचा अनुभव असलेस प्राधान्य.

**२) प्राणिशास्त्रज्ञ तथा शैक्षणिक अधिकारी (बायोलॉजिस्ट) - पदसंख्या - १**

१) किमान शैक्षणीक अर्हता– जीवशास्र (प्राणि शास्त्र, वनस्पती शास्त्र, सुक्ष्मजीव शास्त्र, वन्यजीव शास्त्र, पर्यावरण शास्त्र इ. पैकी किमान एका विषयात) पदवी अथवा पदव्यूत्तर पदवी. (Graduation or post-graduation with specialization in Life Sciences)

२) वन्यजीव विषयक शैक्षणिक तथा जनजागृतीपर कार्यक्रम राबविण्याचा अनुभव

३) मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषेतील लेखन आणि वाक्‌कौशल्य आवश्यक

४) प्राणि संग्रहालयातील कामकाजाचा अनुभव असलेस प्राधान्य

उपरोक्त मानधनावरील पदे

(१) पशुवैदयक- एकत्रित मानधन र.रु.४५,०००/- प्रतिमहा, पदसंख्या- १

(२) प्राणिशास्त्रज्ञ तथा शैक्षणिक अधिकारी (बायोलॉजिस्ट) -एकत्रित मानधन र.रु.३०,०००/- प्रतिमहा, पदसंख्या - १

एकत्रित मानधन तत्वावर नियुक्तीची कार्यवाही करणेबाबत ७ दिवस कालावधीकरिता जाहीरात प्रसिध्द होवून थेट मुलाखत पध्दतीने (WALK IN INTERVIEW) ने एकत्रित मानधन तत्वावर घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –४५७ विषय क्रमांक – २२

दिनांक – ३१/०५/२०१७ विभाग – स्थापत्य मुख्य कार्यालय

सूचक – मा.उत्तम कैंदळे अनुमोदक – मा.उषा मुंढे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/लेखा/८/कावि/६६५/२०१७ दि.२४/५/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

स्थापत्य मुख्य कार्यालयातील उपअभियंता यांचे कडील वाहन क्रमांक MH-14-X-5538 या वाहनासाठी लागणारे ५ टायर टयुब मनपाने निश्चित केलेल्या मे.सिएट कंपनी टायर्स खेड चिबळी फाटा पुणे या उत्पादीत कंपनीकडून तातडीने खरेदी करुन त्यानुसार र.रु.२३,६०४/- (अक्षरी र.रु. तेवीस हजार सहाशे चार रुपये फक्त) आगावू अदाकरणेत आले होते. परंतु सदर खरेदी होई पर्यत टायर ट्युबची किमंत बाजार भावाने र.रू.७३०/- ने वाढली त्यामुळे टायर ट्युब खरेदी करते वेळे र.रू.७३०/- सबंधित कपंनीस अदा करून त्या करिता प्रत्याक्षात खर्च र.रू २४,३३४/- झाला आहे, सदरची खरेदी सरकारी दराने करणेत आलेले आहे. त्यामुळे सदर रकमेचे समायोजन व एकूण झालेला खर्च र.रु.२४,३३४/-(अक्षरी र.रु.चोवीस हजार तीनशे चौतीस रुपये फक्त) चे अवलोकन होणे आवश्यक आहे. तसेच मे.सिएट कंपनी टायर्स खेड चिबळी फाटा पुणे यांना आगाऊ केलेली रक्कम वजा जाता उर्वरित र.रु.७३०/- श्रीमती विजया कांबळे लिपीक यांनी स्वता: खर्च केलेली असलेने त्यांची प्रतिपुर्ती करून देणे आवश्यक असल्याने आलेल्या र.रु.२४,३३४/-(अक्षरी र.रु.चोवीस हजार तीनशे चौतीस रुपये फक्त) चे खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –४५८ विषय क्रमांक – २३

दिनांक – ३१/०५/२०१७ विभाग – विद्युत मुख्यालय

सूचक – मा.माधुरी कुलकर्णी अनुमोदक – मा.हर्षल ढोरे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.वि/मुका/तांमा-२/१७५/१७ दि.२४/५/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या प्रशासकीय इमारतीमधील उद्वाहक क्र.1 ते 4 ची वार्षीक पद्धतीने देखभाल दुरूस्ती करणेकामी 2017/18 ( मे.ओटीस मेक) हे काम उत्पादीत कंपनी मे.ओटीस इलेव्हेटर कं (इ) लि., पुणे. यांचेकडुन निविदा न मागविता थेट पद्धतीने परंतु रितसर करारनामा करुन घेणेस व त्यापोटी येणारा खर्च रक्कम रुपये 6,25,260/- (अक्षरी र.रू.सहा लाख पंचवीस हजार दोनशे साठ फक्त) आगाऊ अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक – ४५९ विषय क्रमांक – २४
दिनांक – ३१/०५/२०१७ विभाग – पाणीपुरवठा
सूचक – मा.निर्मला कुटे अनुमोदक – मा.कोमल मेवानी
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/६/कावि/२४०/२०१७ दि.२४/५/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाच्या नि.क्र.१२/१९/२०१६-१७ अन्वये सांगवी परिसरात नविन मुख्य वितरण नलिका टाकणे व आवश्यक तेथे वितरण नलिका टाकणे तसेच इतर अनुषंगिक कामे करणेकामी मे.सिद्धेश्वर कन्स्ट्रक्शन निविदा रक्कम रू.२७,९७,०६४/- (अक्षरी र.रू.सत्तावीस लाख सत्त्यान्नव हजार चौसष्ट फक्त) पेक्षा १४.५५% कमी दराने या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.२५,०९,५९५/-पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्याच्याबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४६० विषय क्रमांक – २५
दिनांक – ३१/०५/२०१७ विभाग – पाणीपुरवठा
सूचक – मा.अनुराधा गोफणे अनुमोदक – मा.मोरेश्वर भोंडवे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/६/कावि/२३९/२०१७ दि.२४/५/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाच्या नि.क्र.१२/८/२०१६-१७ अन्वये जुनी सांगवी परिसरात नविन मुख्य वितरण नलिका टाकणे व आवश्यक तेथे वितरण नलिका टाकणे तसेच इतर अनुषंगिक कामे करणेकामी मे.सिद्धेश्वर कन्स्ट्रक्शन निविदा रक्कम रू.२८,००,०८६/- (अक्षरी र.रू.अठ्ठावीस लाख शहाऐंशी फक्त) पेक्षा १५.४०% कमी दराने या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.२४,८७,३१६/-पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्याच्याबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४६१ विषय क्रमांक – २६
दिनांक – ३१/०५/२०१७ विभाग – भूमि आणि जिंदगी
सूचक – मा.हर्षल ढोरे अनुमोदक – मा.आशा धायगुडे-शेंडगे
संदर्भ:- मा.अति.आयुक्त यांचे जावक क्र.भुजिं/२/कावि/१०१/२०१७ दि.२५/४/२०१७

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मौजे पिंपरी चिंचवड महानगरपालिका मनपाच्या मालकीचे मौजे सांगवी स.नं.९ पैकी जागेवरील मनपा शाळा इमारत तळमजला वरील १३ व्यापारी गाळे या गाळ्यापैंकी गाळा क्र.५

भाडेपट्टा/लिजने देणेबाबतचे क्षेत्रफळ २३६.८ चौ.फु. ही मिळकत नगररचना विभागाने तीस वर्षासाठी ठरवुन दिलेला लिजदर र.रु.६३४४/-प्रती चौ.फु. नुसार येणारी लिज र.रु.१५,०२,२५९/- प्रमाणे ३० वर्ष कालावधीसाठी ई-निविदा सुचना क्र.७/२०१५-१६ प्रसिध्द करण्यात आले होते. सदरकामी एकुण ३ निविदा प्राप्त झाल्या असुन सर्व निविदा पात्र ठरलेल्या आहेत. सदरकामी निविदामधील सर्व उच्च दर र.रु.१६,०५,५५५/- हा मे.ढोरे ट्रान्सपोर्ट अँन्ड वॉटर सप्लायर्स सौ.सविता रमेश ढोरे यांनी दर सादर केला आहे. मे.ढोरे ट्रान्सपोर्ट अँन्ड वॉटर सप्लायर्स, सौ.सविता रमेश ढोरे या निविदाधारकांची निविदा ही निविदा दरापेक्षा १०६.८७% जास्त रक्कम रुपये १६,०५,५५५/-(अक्षरी रक्कम रुपये सोळा लाख पाच हजार पाचशे पंचावन्न फक्त) दराची व अटी व शर्तीची पुर्तता करीत असलेने ३० वर्ष कालावधीसाठी लीज दराने देणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

**निर्णय-** मुंबई महापालिकेचे असलेले लग्नाचे हॉल सुद्धा भाड्याने घेतले जातात. आपली महापालिका असे काहीच करताना दिसत नाही. आपल्या महापालिकेचे बरेचसे हॉल बांधून मोकळे पडलेले आहेत. ते अल्पदराने भाड्याने देण्यात यावेत.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –४६२ | विषय क्रमांक – २७

दिनांक – ३१/०५/२०१७ | विभाग – पाणीपुरवठा

सूचक – मा.कैलास बारणे | अनुमोदक – मा.लक्ष्मण उंडे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/६/कावि/२४२/२०१७ दि.२५/५/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाच्या निविदा क्र.९/५/२०१६-१७ अन्वये जलशुद्धीकरण केंद्र से.२३ येथील विजभार वाढविणेकरिता २२ के.व्ही.फिडरचे क्षमता वाढविणे व नुतनीकरण करणेकामी मे.सुमी इलेक्ट्रिकल सर्व्हिसेस यांची निविदा रक्कम रू.४६,६२,०५८/- (अक्षरी र.रू.शेहचाळीस लाख बासष्ट हजार अठ्ठावन्न फक्त) पेक्षा २१.१२% कमी दराने या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.३८,६१,३०२/-पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्याच्याबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –४६३ | विषय क्रमांक – २८

दिनांक – ३१/०५/२०१७ | विभाग – पाणीपुरवठा

सूचक – मा.कोमल मेवाणी | अनुमोदक – मा.अमित गावडे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/६/कावि/२४३/२०१७ दि.२५/५/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाच्या निविदा क्र.८/१४/२०१६-१७ अन्वये पांजरपोळ नविन टाकी ते चक्रपाणी वसाहत मुख्य जलवाहिनी टाकणेकामी सन 2016-17 या कामासाठी

मे.युनिक ट्रेडर्स निविदा रक्कम रू.५६,०२,०८५/- (अक्षरी र.रू.छप्पन लाख दोन हजार पंच्याऐंशी फक्त) पेक्षा १.००% कमी दराने या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.५८,२३,३६७/-पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्याच्याबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –४६४ विषय क्रमांक – २९

दिनांक – ३१/०५/२०१७ विभाग – पाणीपुरवठा

सूचक – मा.कैलास बारणे अनुमोदक – मा.लक्ष्मण उंडे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/६/कावि/२४४/२०१७ दि.२५/५/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मे.जी.एस.कमर्शिअल कॉर्पोरेशन यांचेकडून ३१५ मे.टन लिक्वीड क्लोरीन गॅस (६०% परिमाण) र.रू.७,८७०/- प्र.मे.टन या दराने होणारा खर्च र.रु.२४,७९,०५०/- व 2nd Lowest ठेकेदार मे.आयडिअल केमिकल (इं) प्रा.लि. यांचेकडून १०५.०० मे. टन लिक्वीड क्लोरीन गॅस (२०% परिमाण) र.रू.७,८७०/- प्र.मे.टन या दराने होणारा खर्च र.रु.८,२६,३५०/- व मे.रंग रसायन यांचेकडून १०५.०० मे.टन लिक्वीड क्लोरीन गॅस (२०% परिमाण) र.रू.७,८७०/- प्र.मे.टन या दराने होणा-या र.रु.८,२६,३५०/- (एकत्रित अपेक्षित खर्च रू.४१,३१,७५०/-) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –४६५ विषय क्रमांक – ३०

दिनांक – ३१/०५/२०१७ विभाग – पाणीपुरवठा व जलनिःसारण

सूचक – मा.अमित गावडे अनुमोदक – मा.कुंदन गायकवाड

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.पापु/जनि/०५/कावि/४७६/२०१७ दि.२४/५/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

India Infrastructure, New Delhi या संस्थेमार्फत 5th Annual Conference on "Water In India-Services & Management, Technologies & Best Practices या विषयावर Le Meridian, New Delhi येथे दि.२७/०२/२०१७ ते २८/०२/२०१७ या कालावधीत प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करणेत आली होती. सदरील कार्यशाळेस उपस्थित राहणेकामी श्री.तांबे रामदास गणपत कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा विभाग यांना उपरोक्त आदेशान्वये मा.आयुक्त सो. यांनी आदेशित केले होते. त्यानुसार श्री.तांबे रामदास गणपत कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा विभाग यांनी नवी दिल्ली येथील प्रशिक्षणास उपस्थित राहून प्रशिक्षण पूर्ण केले आहे. त्याबद्दल त्यांना सदर संस्थेतर्फे प्रमाणपत्र देणेत आलेले आहे. सदरचे प्रशिक्षणास उपस्थित राहणेकरिता कार्य.अभियंता श्री.तांबे रामदास गणपत यांनी दि.२६/०२/२०१७ रोजी पुणे ते दिल्ली व दि.२८/०२/२०१७ रोजी दिल्ली ते पुणे एयर इंडिया(AIR INDIA) विमानाने प्रवास केलेला आहे. विमान प्रवास खर्च रक्कम रु.१३,९८१/-

(अक्षरी र.रू. तेरा हजार नऊशे ऐक्याऐंशी फक्त)चे बिले सादर केले असल्याने सदरची रक्कम श्री.तांबे रामदास गणपत यांना अदा करणेस कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४६६ विषय क्रमांक – ३१

दिनांक – ३१/०५/२०१७ विभाग – स्थापत्य

सूचक – मा.उत्तम केंदळे अनुमोदक – मा.उषा मुंढे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/नि/४ड/कावि/२०३/१७ दि.२५/५/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र. ३७/२४/१६-१७ अन्वये प्रभाग क्र.३३ गवळीनगर १,२,३मध्ये पेव्हिंग ब्लॉक बसविणेकामी मे.डी.डी.कन्स्ट्रक्शन नि.र.रु.३८,५८,२९८/- (अक्षरी र.रू.अडोतीस लाख अठ्ठावन्न् हजार दोनशे अठ्यान्नव फक्त) पेक्षा ५.२०% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.३८,४०,५५०/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४६७ विषय क्रमांक – ३२

दिनांक – ३१/०५/२०१७ विभाग – माहिती तंत्रज्ञान

सूचक – मा.माधुरी कुलकर्णी अनुमोदक – मा.हर्षल ढोरे

संदर्भ:- मा.महापालिका अति.आयुक्त यांचे जावक क्र.मातंवि/११/कावि/१९९/१७ दि.२५/५/२०१७

मा.महापालिका अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

निविदा सूचना क्रमांक १२/२०१६-१७ नुसार लघुत्तम निविदा धारक मे.टेक नाईन सर्विसेस यांना ई-गव्हर्नन्स प्रकल्पांतर्गत विकसित करणेत आलेल्या सात संगणक प्रणालींची देखभाल दुरूस्तीकामी १ वर्ष कालावधी करीता मनुष्यबळ उपलब्ध करणेचे कामकाज देण्यास तसेच त्यांचेसोबत कामाचा करारनामा करण्यास व त्यासाठी येणा-या र.रू.९,१९,५१२**/-** (अक्षरी र.रू.नऊ लाख एकोणीस हजार पाचशे बारा फक्त) अंदाजपत्रकीय दरा पेक्षा -३.१६% ने कमी चे दरास व त्या अनुषंगाने येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –४६८ विषय क्रमांक – ३३
दिनांक – ३१/०५/२०१७ विभाग – स्थापत्य क क्षेत्रीय कार्यालय
सूचक – मा.निर्मला कुटे अनुमोदक – मा.कोमल मेवानी
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/कक्षे/कावि/५४८/२०१७ दि.२६/५/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका ‘क’क्षेत्रिय विभागाचे कार्यक्षेत्रातील प्रभाग क्र.४० व ४१ मध्ये खालीलप्रमाणे अंदाजपत्रकातील कामे आहेत.

१) प्रभाग क्र.४० व ४१ मधील अल्पसंख्यांकसाठी इमारती बांधणे.
२) प्रभाग क्र.४० खराळवाडीमध्ये बालसंस्था केंद्र व परिक्षा मार्गदर्शन केंद्र इमारत बांधणे.
३) प्रभाग क्र.४१ गांधीनगर मधील भगवतगीता वडार समाज मंदिरामध्ये काम करणे.

वरील उपरोक्त प्रस्तावित कामे करणेसाठी इमारतीचे नकाशे बनविणे,प्लॉनिंग व डिझाईन तयार करणे, अंदाजपत्रक तयार करणे व बांधकाम परवाना घेणे व निविदापुर्व कार्यवाही पर्यंत सर्व कामे करणे यासाठी त्यांची वास्तुविशारद/सल्लागार म्हणून नेमणूक करणे व त्यासाठी मे.एस.के.असोसिएट्स (श्री.दयानंद काशीनाथ शिंदे), पिंपरी, पुणे यांची वास्तुविशारद म्हणून नेमणूक करण्यास व त्यांना म.न.पा. मान्य दराने कामाच्या किमतीच्या र.रू.५० लाखापर्यंत ३% व ५० लाखाच्या पुढे २% याप्रमाणे सर्व करांसह फि अदा करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक –४६९ विषय क्रमांक – ३४
दिनांक – ३१/०५/२०१७ विभाग – मध्यवर्ती भांडार
सूचक – मा.उत्तम केंदळे अनुमोदक – मा.उषा मुंढे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.मभां./०४/कावि/३००/२०१७ दि.२६/०५/२०१७

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाचे कर्मचारी महासंघाकडील मागणी विचारात घेता मनपा गणवेश देय कर्मचा-यांना सन 2016-17 करीता गणवेश कापड मागणी यापुर्वीचे ई निविदा सुचना क्र.17/2016-17 चे पुनर्प्रत्ययी आदेशानुसार मे.महालक्ष्मी ड्रेसेस अँड टेलरींग फर्म, पुणेयांना बाब क्र.01 ते 12 साठी एकुण र.रु.1,01,90,695/- (अक्षरी र.रु.एक कोटी एक लाख नव्वद हजार सहाशे पंच्यान्नव फक्त) चे खर्चास व त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

**निर्णय-** नगरसेवकांना देखील ड्रेसकोड दिले पाहीजेत. महापालिकेतील महिला अधिका-यांना देखील ड्रेसकोड द्यावेत. वर्ग १ व वर्ग २ अधिका-यांना ब्लेझर देऊन त्यावर नेमप्लेट आणि महापालिकेचे सिंबॉल असावे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(सिमा रविंद्र सावळे)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/१०/कावि/४२/२०१७
दिनांक - ०९/०६/२०१७



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.